**आकाशवाणी मुंबई**

**प्रादेशिक बातम्या देत आहे.**

**<u>ठळक बातम्या</u>**

संसदेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात

ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगरमध्ये महिला महापौर

पुण्यातल्या पोर्श अपघात प्रकरणातल्या ३ आरोपींना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन

**आणि**

धर्मगुरू दलाई लामा आणि के पॉप यांना पहिल्यांदाच ग्रॅमी पुरस्कार

**लोकसभा पूल जीवन**

लोकसभेत आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात झाली. राष्ट्रपतींचा संदेश अतिशय महत्त्वपूर्ण होता असं म्हणत केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी धन्यवाद प्रस्ताव मांडला. देशाच्या भविष्याविषयी अतिशय प्रभावी दृष्टीकोन राष्ट्रपतींनी या भाषणात व्यक्त केला. सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकास आणि विकसित भारताचं सरकारं उद्दिष्ट यात प्रतिबिंबित होत असल्याचं सोनोवाल म्हणाले. त्यानंतर खासदार तेजस्वी सूर्या यांनी यावर भाषण केलं. गेल्या १२ वर्षात केंद्र सरकारवर एकही भ्रष्टाचाराचा आरोप झाला नसल्याचं ते यावेळी म्हणाले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यावर बोलायला सुरुवात केल्यावर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्या काही मुद्द्यांवर आक्षेप घेतला. त्यानंतर झालेल्या गदारोळामुळं लोकसभेचं कामकाज ३ वाजेपर्यंत तहकूब झालं.

राज्यसभेत सी सदानंदन मास्टर यांनी धन्यवाद प्रस्ताव मांडला. लोकसभेत यावर १८ तास चर्चा होईल आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बुधवारी या चर्चेला उत्तर देतील, अशी माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रीजिजू यांनी दिली. राज्यसभेत यावर १६ तास चर्चा होईल. त्यानंतर केंद्रीय अर्थसंकल्पावरची चर्चा सुरू होईल.

**राज्यसभा वेब जीवन**

मिटेनी या कंपनीकडून मशीनरी खरेदी करुन रत्नागिरी जिल्ह्यात रसायन प्रकल्प उभा राहत असल्याचा मुद्दा राज्यसभेतले काँग्रेस उपनेते प्रमोद तिवारी यांनी शून्य प्रहरात उपस्थित केला. इटलीसारख्या देशांनी बंद केलेल्या कंपनीकडून वस्तू आणि रसायनांची होणारी खरेदी पर्यावरणासाठी हानीकारक असेल. याचा कोकण किनारे आणि पश्चिम घाटाला फटका बसेल, असा दावा त्यांनी केला. याप्रकरणी सरकारनं महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अहवाल मागवावा तसंच इतर देशात बंद करण्यात आलेला प्रकल्प रत्नागिरीत कसा उभा राहिला याची चौकशी करावी अशी मागणी त्यांनी केली.

**महापौर निवड/वानखेडे+२ मुंबई - गौरीशंकर २+१ धुळे २/श्रद्धा**

**ठाणे** जिल्ह्यातल्या ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगर या तिन्ही महापालिकेत महिलांना महापौरपद देण्याचा निर्णय शिवसेनेनं घेतला आहे. ठाण्यातून शर्मिला पिंपळोलकर-गायकवाड, कल्याण डोंबिवलीत हर्षाली थविल चौधरी आणि उल्हासनगरमध्ये अश्विनी निकम यांची महापौरपदी वर्णी लागणार आहे.

**नागपूरमध्ये** आज भाजपाच्या नीता ठाकरे यांनी महापौर पदासाठी तर लीला हाथीबेड यांनी उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र सादर केलं. काँग्रेसकडून महापौर पदासाठी स्नेहल ठाकरे तर उपमहापौर पदासाठी विवेक निकोसे यांनी अर्ज दाखल केले आहेत. नागपूरचं महापौर पद सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव आहे. नागपूरमध्ये शुक्रवारी महापौर, उपमहापौरपदाची निवडणूक होणार आहे.

अमरावतीमध्ये भाजपनं श्रीचंद तेजवानी यांना महापौरपदाची उमेदवारी जाहीर केली आहे.

**धुळे** महापालिका महापौर पदासाठी आज भाजपाकडून मायादेवी परदेशी यांनी तर उपमहापौर पदासाठी ज्योत्स्ना पाटील यांनी अर्ज दाखल केले. तसंच शिवसेनेच्या गिता नवले यांनी महापौर पदासाठी आणि इरफान फजलु अन्सारी यांनी उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र भरलं आहे.

चंद्रपूर महापालिकेत महापौर पदाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून त्याआधी काँग्रेस महासचिव के. सी वेणुगोपाल यांच्याबरोबर उद्या दिल्लीत बैठक होणार आहे. या बैठकीनंतर तोडगा निघेल असं काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

**उपमुख्यमंत्री- कराड भेट/४,५ सातारा २/श्रद्धा**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज सातारा जिल्ह्यातल्या कराड इथल्या  प्रितीसंगमावर यशवंतराव चव्हाण यांच्या समाधी स्थळी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं.

त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्यासह विमान अपघातात मृत झालेले पोलीस कर्मचारी विदीप जाधव यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं.

**<u>पोर्श जामीन सर्वोच्च न्यायालय/पीटीआय/रश्मी</u>**

पुण्यात २०२४मध्ये झालेल्या पोर्श अपघात प्रकरणातल्या तीन आरोपींना सर्वोच्च न्यायालयाने आज जामीन मंजूर केला. सतीश गायकवाड, आदित्य सूद आणि आशीष मित्तल अशी या तीन आरोपींची नावं आहेत. आरोपींनी दाखल केलेल्या जामीन अर्जांवर आज न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि उज्ज्वल भूयान यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. जामीन मंजूर करताना न्यायालयाने अल्पवयीन मुलांचा समावेश असलेल्या गुन्ह्यांसाठी पालकांना जबाबदार धरायला हवं, अशा शब्दांत ताशेरे ओढले. १९ मे २०२४रोजी पुण्यात एका अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवताना धडक दिल्यामुळे दोघांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी रक्ताचा नमुना बदलणं, तसंच सहआरोपींच्या रक्ताच्या चाचण्यांसाठी आपल्या रक्ताचे नमुने देणं, हा आरोप या तिघांवर आहे.

**<u>सावरकर सदन/पीटीआय/रश्मी</u>**

मुंबईत दादर इथे असलेलं सावरकर सदन १०० वर्षं जुनं नसल्याने या जागेला संरक्षित घोषित करता येणार नाही, अशी माहिती भारतीय पुरातत्व विभागाने मुंबई उच्च न्यायालयात दिली. मात्र, ही इमारत मुंबई महानगरपालिकेच्या वारसा यादीत किंवा राज्याच्या संरक्षित स्मारकांच्या यादीत समाविष्ट केली जाऊ शकते, असं विभागाने सुचवलं आहे. अनेक महत्त्वाच्या बैठकींची साक्षीदार असलेली ही वास्तु संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची मागणी करणारी याचिका अभिनव भारत काँग्रेस या सार्वजनिक संस्थेने दाखल केली होती. त्याविषयी प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले होते.

**<u>अपघात-नंदुरबार / पी टी सी / सूर्यकांत</u>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या कोंडाईबारी घाटात झालेल्या एका बस, कंटेनर आणि ट्रकच्या अपघातात बस चालक आणि वाहकासह १२ प्रवासी जखमी झाले आहेत. मागून येणाऱ्या ट्रकनं जोरदार धडक दिल्यानं हा अपघात झाला.

**वाघ जेरबंदी-गोंदिया / पी टी सी / सूर्यकांत**

गोंदिया जिल्ह्याच्या सडक अर्जुनी तालुक्यातल्या सौंदड भवतालच्या परिसरात धुमाकूळ घातलेल्या एका नरभक्षक वाघाला जेरबंद करण्यात वनविभागाच्या चमूला आज यश आलं. या वाघानं दोन दिवसांपूर्वी माहुली इथल्या शेतात काम करत असलेल्या एका वृद्ध महिलेवर हल्ला करून तिला ठार केलं होतं. त्या व्यतिरिक्त या वाघानं एका युवकावर हल्ला करून त्यालाही जखमी केलं होतं.

**MANDAVIYA-QUIZ/पूल/राजश्री**

केंद्र सरकार 'माय भारत बजेट क्वेस्ट', हा उपक्रम सुरू करणार असल्याची घोषणा युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी आज नवी दिल्लीत केली. ‘माय भारत’ प्लॅटफॉर्मवर उद्यापासून ही स्पर्धा सुरु होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. येत्या १७ फेब्रुवारी पर्यंत या स्पर्धेसाठी नोंदणी करता येईल. पहिल्या फेरीत ३० प्रश्नांची ऑनलाईन प्रश्नमंजुषा असेल. या फेरीत प्रत्येक राज्यातल्या सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांची निवड होईल, त्यानंतर निबंध लेखन फेरी असेल. या फेरीत युवकांना यंदाच्या अर्थसंकल्पावर आधारित ८ विषय दिले जातील.

निबंध लेखन फेरीत निवड झालेल्या युवकांना येत्या मार्च महिन्यात ‘विकसित भारत’ अर्थसंकल्पाच्या दृष्टिकोनावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधण्यासाठी निमंत्रित केलं जाईल अशी माहिती त्यांनी दिली.

**<u>ग्रॅमी पीटीआय जीवन</u>**

धर्मगुरू दलाई लामा आणि के पॉप डेमॉन हंटर्स यांना यंदाचा ग्रॅमी पुरस्कार घोषित झाला आहे. त्यांचा हा पहिलाच ग्रॅमी पुरस्कार आहे. श्राव्य पुस्तकं, कथाकथन या श्रेणीत दलाई लामा यांना हा पुरस्कार मिळाला. तर दृकश्राव्य श्रेणीत के पॉप यांच्या गोल्डन या गाण्याला हा पुरस्कार मिळाला.

Music for John Williams या अल्बमसाठी दिग्दर्शक स्टीव्हन स्पीलबर्ग यांनाही पहिल्यांदाच ग्रॅमी पुरस्कार मिळाला आहे.

**<u>शास्त्रज्ञ पीटीआय जीवन</u>**

भारतीय वंशाचे हवामान शास्त्रज्ञ वीरभद्रन रामनाथ यांना रॉयल स्वीडीश अकादमी ऑफ सायन्सेसनं २०२६ या वर्षाचा भूविज्ञानासाठीचा क्रॉफर्ड पुरस्कार जाहीर केला आहे. भूविज्ञानाच्या क्षेत्रातला नोबेल म्हणून हा पुरस्कार ओळखला जातो. सुमारे ९ लाख डॉलर आणि सुवर्णपदक असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. ८२ वर्षाचे असलेले रामनाथन कॅलिफोर्निया विद्यापीठात प्रतिष्ठीत प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

कार्बन डाय ऑक्साइडच्या तुलनेत १० हजार पट अधिक कार्यक्षमतेने क्लोरोफ्लुरोकार्बन वातावरणात उष्णता साठवून ठेवतात असा शोध त्यांनी नासामध्ये कार्यरत असताना १९७५ मध्ये लावला होता. तोपर्यंत जागतिक तापमान वाढीला कार्बन डाय ऑक्साइड जबाबदार असल्याचा समज होता. मदुराईमध्ये जन्मलेले आणि चेन्नईत मोठे झालेल्या रामनाथन यांनी सिकंदराबादमध्ये फ्रीजच्या कारखान्यात पहिली नोकरी केली होती.

**<u>जयशंकर अमेरिका दौरा/पूल/रश्मी</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आजपासून तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी अमेरिकेला रवाना झाले. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी आयोजित केलेल्या महत्त्वपूर्ण खनिजविषयक मंत्रिस्तरीय बैठकीत ते सहभागी होणार आहेत. या बैठकीत पुरवठा साखळीची लवचिकता, स्वच्छ उर्जेचं संक्रमण आणि महत्त्वपूर्ण खनिजविषयक धोरणात्मक सहकार्य या विषयांवर चर्चा होणार आहे.

**खजूर लागवड- अकोला / पी टी सी / सूर्यकांत**

पारंपरिक शेतपिकांऐवजी शाश्वत आणि अधिक उत्पन्न देणाऱ्या पर्यायी पिकांकडे वळण्याच्या प्रक्रियेतला एक वेगळा प्रयत्न म्हणून अकोला जिल्ह्याच्या बाळापूर तालुक्यातल्या देगाव इथल्या शेतकऱ्यांनी खजूर लागवड केली आहे. देगाव परिसर लिंबू पिकासाठी प्रसिद्ध असूनही एक वेगळा मार्ग अनुसरत या शेतकऱ्यांनी आदर्श निर्माण केला आहे.

**ठळक बातम्या पुन्हा एकदा...**

संसदेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात

ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगरमध्ये महिला महापौर

पुण्यातल्या पोर्श अपघात प्रकरणातल्या ३ आरोपींना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन

**आणि**

धर्मगुरू दलाई लामा आणि के पॉप यांना पहिल्यांदाच ग्रॅमी पुरस्कार

**याबरोबरच आकाशवाणी मुंबई केंद्रावरचं हे प्रादेशिक बातमीपत्र संपलं. पुन्हा भेटूया संध्याकाळी ५ वाजता आकाशवाणी मुंबईच्या पुढच्या बातमीपत्रात नमस्कार...**